# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे

# नवीन थेरगाव रुग्णालय
# थेरगाव – ४११ ०३३

## ( मॅन्युअल क्र. २ )

- ❖ कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये

वैद्यकीय संचालक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ६९(१) नुसार मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशासन/१/कावि/२६८/२००२, दि. ०२/०५/२००२ अन्वये खालीलप्रमाणे अधिकार नेमलेले आहेत.

| अ.क्र. | अधिकारीचे स्वरूप | अधिकार वापरण्याचे कार्यक्षेत्र | विहित कार्यपद्धती |
|---|---|---|---|
| १. | वर्ग १ व २ मधील वैद्यकीय अधिकारी यांच्या ३० दिवसांपर्यंत अर्जित, विशेष, पुर्णवेतनी परवर्तीत व वैद्यकीय रजा (क्षयरोग, कुष्ठरोग, पक्षघात, विकलांग, प्रसूती व गर्भपात इ. सह.) मंजूर करणे. | नवीन थेरगाव रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदी नुसार |
| २. | वर्ग १ व २ मधील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून बेशिस्त वर्तनाबाबत नोटीस/ज्ञापन या द्वारे खुलासा मागविणे सक्त ताकीद देणे. | नवीन थेरगाव रुग्णालय | महारष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक, शिस्त व अपील) नियम १९८१ मधील तरतुदी नुसार |
| ३. | वर्ग १ व २ मधील वैद्यकीय अधिकारी यांच्या नियमित वेतनवाढी मंजूर करणे, सेवानोंद पुस्तकात नोंदी घेणे. | नवीन थेरगाव रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील तरतुदी नुसार |
| ४. | कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे | नवीन थेरगाव रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक, शिस्त व अपील) नियम १९८१ मधील तरतुदी नुसार |
| ५. | कुटुंब कल्याण कार्यक्रमा अंतर्गत शासन नियमानुसार खाजगी व्यावसायिकांची मुशाहिरा बिले प्रथम म.न.पा. फंडातून मंजूर करणे व या बिलांची शासनाकडून प्रतिपूर्ती करणे. | पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रापुर्ते मर्यादित | शासनाने दिलेल्या स्थायी आदेशानुसार |
| ६. | कुटुंब कल्याण विभागाच्या संपूर्ण आस्थापनेचे कामकाज (पगार बिले, रजा, अनुदान इ.) | पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रापुर्ते मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी नुसार |
| ७. | राष्ट्रीय कार्यक्रम तसेच एड्स नियंत्रण कार्यक्रम, ट्रकर्स, प्रोजेक्ट, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरोग निवारण कार्यक्रम, हिवताप प्रतिरोध कार्यक्रम साथरोग (जलजन्य व इतर) नियंत्रण कार्यक्रम, अंधत्व निवारण कार्यक्रम, शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत वर्ग १ ते ४ मधील जबाबदार कर्मचाऱ्यांना ज्ञापन, नोटीसा, सक्त ताकीद देणे व त्यांच्याकडून खुलासा मागविणे. | नियंत्रणाखाली सोपविण्यात आलेली रुग्णालये, दवाखाण्यापुरते मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक, शिस्त व अपील) नियम १९८१ मधील तरतुदी नुसार |
| ८. | राष्ट्रीय कार्यक्रम अंमलबजावणीबाबत कार्यवाही करणे व शासनाकडून प्राप्त होणाऱ्या या अनुदानाच्या बिलांची प्रतिपूर्ती / समायोजन करणे, तसेच नागरिकांचे सोयीसाठी निरनिराळ्या प्रकारची मोफत आरोग्य विषयक शिबिरे आयोजित करणेस मान्यता देणे, त्याकरिता लागणारे छपाई साहित्य, पेंटिंग साहित्य, स्टिकर्स, बॅनर्स, वॉलपेंटिंग, तसेच राष्ट्रीय कार्यक्रमासाठी भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांची बिले अदा करणे. | पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रापुर्ते मर्यादित | शासनाने दिलेल्या स्थायी आदेशानुसार व प्रचलित कार्यपद्धती व लेखा संहितानुसार |

वैद्यकीय अधिक्षक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६९(१) नुसार मा. आयुक्त यांचे कडील आदेश क्र. प्रशासन/९२३/१९९६, दि. ३१/१०/१९९६ अन्वये खालील प्रमाणे अधिकार प्रदान केलेले आहेत.

| अ.क्र. | अधिकारीचे स्वरूप | अधिकार वापरण्याचे कार्यक्षेत्र | विहित कार्यपद्धती |
|---|---|---|---|
| १. | आहरण व विवरण अधिकारी म्हणून काम पाहणे (वेतन बिले, फरक बिले, वैद्यकीय बिले, शिलाई बिले अदा करणेचे संदर्भात) | नवीन थेरगाव रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांसाठी | लेखा संहितेनुसार व प्रचलित नियमांचे पालन करून कार्यवाही |
| २. | किरकोळ व वैकल्पिक रजा मंजूर करणे. | नवीन थेरगाव रुग्णालयातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांसाठी | महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही |
| ३. | वर्ग १, २ व ३ चे अधिकाऱ्यांच्या ३० दिवसांपर्यंत व वर्ग ४ मधील अधिकाऱ्यांच्या त्यापेक्षा जास्त कालावधीच्या अर्जित रजा, सरेंडर रजा मंजूर करणे, क्षयरोग, कुष्ठरोग, पक्षघात, विकलांगता, प्रसूती, गर्भपात या सारख्या विशेष रजा तसेच परावर्तीत व अर्धवेतनी रजा मंजूर करणे. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही |
| ४. | वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांना दक्षतारोध ओलांडणेस मान्यता देणे, वेतननिश्चिती करणे व सेवानोंद पुस्तकात सर्वप्रकारच्या नोंदी घेऊन स्वाक्षऱ्या करणे.<br>वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनवाढी मंजुर करणे. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही |
| ५. | वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांचे विरुध्द ठपका वेतनवाढ रोखून ठेवणे, दक्षता रोध ओलांडून न देणे (यात पदोन्नती रोखून ठेवणे यांचा समावेश असणार नाही) दंड करणे, ताकीद देणे, कोणत्याही हानीची रक्कम वेतनातून वसूल करणे इ. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) पोटकलम (अ) (ब) व (द) मधील नियम व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियमातील विहित पद्धतीनुसार कार्यवाही |
| ६. | वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती करणेच्या संदर्भात तांत्रिक तपासणी करून शिफारस करणे तसेच वैद्यकीय कारणासाठी अग्रिमधांची शिफारस करणे. | पिंपरी चिंचवड महापालिका सेवेतील कर्मचाऱ्यांचे बाबतीत | महापालिका सभेने समंत केलेले ठराव व नियमानुसार कार्यवाही |
| ७. | स्वतःचे अग्रिमधन रकमेमधून किरकोळ खर्च, पेट्रोल, डीझेल वाहन दुरुस्ती या पोटी रू. ५००/- पर्यंत खर्चाच्या बिलास मंजुरी देणे व स्थायी अग्रिमधन रजिस्टर ठेवणे. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | लेखा संहिता व प्रचलित नियमानुसार कार्यवाही |

प्रशासन अधिकारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६९(१) नुसार मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. प्रशासन/१/कावि/९२३/१९९६, दि. ३१/१०/१९९६ अन्वये खालीलप्रमाणे अधिकार प्रदान केलेले आहेत.

| अ.क्र. | अधिकारीचे स्वरूप | अधिकार वापरण्याचे कार्यक्षेत्र | विहित कार्यपद्धती |
|---|---|---|---|
| १. | वर्ग २ ते वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा, ३० दिवसांपर्यंत अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या अर्जित रजा, सरेंडर रजा, रजा प्रवास भत्त्यासह मंजूर करणे, क्षयरोग, कुष्ठरोग, पक्षाघात, विकलांगता, प्रसूती तसेच परावर्तीत रजा व अर्धवेतनी रजा मंजूर करणे. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५७(३) नुसार कार्यवाही |
| २. | वर्ग ४ मधील कर्मचाऱ्याकडून बेशिस्त वर्तनाबाबत नोटीस, ज्ञापन या द्वारे खुलासा मागविणे व ताकीद देणे. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही |
| ३. | वर्ग २ ते वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनवाढ मंजूर करणे. (यामध्ये दक्षता रोध असणार नाही) | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही |
| ४. | वर्ग २ ते ४ मधील अधिकारी / कर्मचारी यांचे रजा मंजुरी, वेतनवाढ यासारख्या सर्वप्रकारच्या नोंदी मंजूर आदेशानुसार सेवानोंद पुस्तकात घेणे. | नवीन थेरगाव रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नुसार कार्यवाही |